जलन - ३

दस्त क्र. २९०७ /२०१७

४/२८

# कधीही न रद्द होणारे जनरल मुखत्यार पत्र

कधीही न रद्द होणारे जनरल मुखत्यार पत्र आज

**दि. ४ माहे ऑगस्ट, सन २०१७, वार शुक्रवार, दिवशी**

**आदित्य बिल्डर्स अँड डेव्हलपर्स**
पॅन. न. AASFA5136H
**तर्फे प्राधिकृत भागीदार**
**श्री. सुमित प्रकाशचंद मुथा** उ.व. ४२,
धंदा : व्यापार, ऑफिस पत्ता : रिंग रोड, ललित कला भवनसमोर,
जळगाव, ता. जि. जळगाव.
(यानंतर त्यांचा उल्लेख "डेव्हलपर्स"(विकासक) असा करण्यात येईल. सदर संज्ञा जिचा संदर्भ प्रतिकूल नसल्यास किंवा अर्थ वेगळा/विरुद्ध नसेल, म्हणजेच त्यात त्यांचे परस्पर, पेढीत असलेले सध्याचे भागीदार आणि त्यांच्या मागून येणारे भागीदार , त्याचे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक आणि शेवटी बाकी असलेल्या भागीदारांचेअभिहस्तांकिती यांचा समावेश असेल.)

**-----लिहून घेणार**

**यांना**

**श्री. राजेंद्र रघुनाथ पाटील** उ.व. ७६,
धंदा : नोकरी, रा. : १६, अ पटेल नगर, गिरणा टाकी रोड,
जळगाव ता.जि. जळगाव.
पॅन. नं. AEYPP8942A
(यानंतर त्यांचा उल्लेख "मालक" असा करण्यात येईल. सदर संज्ञा जिचा संदर्भ प्रतिकूल नसल्यास किंवा अर्थ वेगळा नसेल, म्हणजेच त्यात त्यांचे परस्पर वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, व्यवस्थापक आणि कायदेशीरपणे मालमत्ता घेणाऱ्या मुखत्यारचा समावेश असेल.)

**-------लिहून देणार**

करणे कधीही न रद्द होणारे जनरल मुखत्यार पत्र लिहून देतो की,

ज्याअर्थी लिहून देणार हे तुकडी जिल्हा जळगाव, पोट तुकडी तालुका जळगाव, सब-रजिस्ट्रेशन ऑफिस, जळगाव पैकी मौजे मेहरूण शिवारातील जळगाव शहर महानगरपालिका जळगाव यांचे हद्दीतील, (विभाग क्र. ७/२१७अ) मेहरूण शेत सर्व्हे नंबर ४७७ यात मंजूर केलेल्या नकाशा प्रमाणे प्लॉट पाडलेले असून त्यापैकी प्लॉट नं. १६ याचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ७१९.७३ चौ.मी. (७७४७ चौ. फुट) असून विस्तारित क्षेत्र सिटी सर्व्हे, जळगाव नुसार नगर भूमापन क्र. ६६७३ दिलेला असून त्याचे एकूण क्षेत्र ७३३.३० चौ.मी. आहे. सदर प्लॉट जागेस मे. ॲडीशनल तहसीलदार, जळगाव युनिट नं. १ यांचेकडील आदेश क्र. एल.एन.ए./एस.आर./१६/७८ दिनांक २७/१०/१९७८ नुसार स्वतंत्र बिनशेती परवानगी घेतलेली आहे. या संपूर्ण प्लॉट जागेपैकी पश्चिमेकडील निम्मे प्लॉट जागा याचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ३५९.७६ चौ.मी. (३८७२.५ चौ. फुट) असून सिटी सर्व्हे रेकॉर्डप्रमाणे क्षेत्र ३६६.६५ चौ.मी. आहे. तसेच प्रस्तावित बांधकाम प्लॅन नुसार क्षेत्र ३५९.१६ चौ.मी. (मिळकतीचे सविस्तर वर्णन शेवटी परिशिष्टात केलेले आहे) मिळकतीचे पूर्ण मालक आहेत. (तदनंतर सदर मिळकत म्हणून संबोधित करावे)

ज्याअर्थी लिहून देणार यांनी दि. ०४/०८/२०१७रोजी चा विकसन करारनामा दस्त नं २९०६- लिहून घेणार यांना दुय्यम निबंधक जळगाव -३ येथे लिहून व नोंदवून दिल्याने सदर मिळकतीच्या विकास कार्यासाठी/डेव्हलपमेंट साठी त्याच प्रमाणे लिहून देणार यांना यांना एकाच वेळेस एका पेक्षा जास्त

जलन - ३
दस्त.क्र. २१०८ /२०१७
४/३/२८

ठिकाणी हजर राहणे शक्य होत नसल्याने, तसेच लिहून देणार यांना सदर मिळकतीचे डेव्हलपमेंट करण्याकामी काही एक ज्ञान नसल्याने लिहून देणार यांना सदर कामी हिंडणे फिरणे शक्य होत नसल्याने आम्ही लिहून देणार, तुम्हास म्हणजे लिहून घेणार यांना आमचे म्हणजेच लिहून देणार यांचे जनरल मुखत्यार म्हणून नेमत आहोत.

**जनरल मुखत्यार अटी व शर्ती खालीलप्रमाणे;**

१. लिहून देणार यांच्या वतीने लिहून घेणार यांनी सदर मिळकतीबाबत तलाठी कार्यालयातील सर्व कामे, मा. तहसीलदार कार्यालय, प्रांत अधिकारी कार्यालय, जिल्हा अधिकारी कार्यालय, आयुक्त कार्यालय, शासन, जळगाव शहर महानगरपालिका तथा महसूल खात्यातील सर्व कार्यालय येथील सर्व कामे उदा. अर्ज देणे, जाब जबाब देणे, म्हणणे देणे, प्रकरण दाखल करणे, त्यावर सह्या करणे, ॲफिडेवीट करणे, शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये अर्ज देणे, माहिती घेणे, पत्रव्यवहार करणे, गाव कामगार तलाठी यांचे समोर सह्या करणे, तसेच जमिनीची मोजणी करणे, मुद्रांक खरेदी करणे, पैसे देणे -घेणे इत्यादी.

२. तसेच सदर मिळकतीवर प्रस्तावित इमारतीचा आराखडा, सांगाडा, प्लॅन तयार करणे, गरजेनुसार त्यात बदल/सुधारणा करणे त्याचप्रमाणे सदर मिळकतीवर बांधकामाची परवानगी मिळविणे बाबत सर्व अधिकार बहाल करण्यात आलेले आहेत.

३. तसेच सदर मिळकतीबद्दल न्यायालयीन वाद उपस्थित झाल्यास त्यासंबधी वकील नेमणे, अर्ज करणे, दावा करणे, कैफियत खुलासा, ॲफिडेवीट, अपील ई.सर्व शासकीय व निमशासकीय कामे लिहून देणार यांच्या वतीने लिहून घेणार यांनी करावयाचे आहेत .

४. असे की, सदरील मिळकतीवर प्रस्तावित असलेल्या, बांधण्यात येणाऱ्या, इमारतीचे बांधकाम करणे, गरजेनुसार बांधकामात दुरुस्ती करणे, गरजेनुसार अल्ट्रेशन करणे, सदरील मिळकतीवर प्रस्तावित असलेल्या, बांधण्यात येणाऱ्या, इमारतीबद्दलचे सर्व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना बहाल केलेले आहे.

५. असे की, सदर मिळकतीवर प्रस्तावित असलेल्या, बांधण्यात येणाऱ्या, इमारतीचे बांधकाम पूर्ण करणे पूर्णत्वाचा दाखला जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांच्या कडून मिळवणे. तसेच लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना सदर इमारतीमधील बांधण्यात येणाऱ्या/ बांधलेल्या एकूण ८ (आठ) फ्लॅट पैकी मालकाला पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. १०१ व १०२, दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०१ व २०२ आणि तळ मजल्यावरील दुकान नं. २ (दोन) मोबदल्यापोटी मिळावयाचे बांधकाम लिहून देणार यांना कायदेशीररीत्या डीड ऑफ कनफर्मेशन, खरेदी खत इत्यादी आवश्यक ते दस्तऐवज लिहून नोंदवून देण्याचे सर्व हक्क लिहून घेणार यांना लिहून देणार यांनी बहाल केले आहेत. तसेच उर्वरीत तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०१ व ३०२, चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४०१ व ४०२ आणि तळ मजल्यावरील दुकान नं. १ चे बांधकाम बद्दल कोणासोबतही, विक्रीकामी सौदे करणे, त्यासाठी विसार पावती, साठेखत करारनामे, एम.ओ.यु., खरेदीखत, संमतीपत्र, भरणा पावती, कन्फर्मेशन डीड, रद्दबादल पत्र-करारनामा, चूक दुरुस्ती, पुरवणी करार, डिक्लेरेशन ऑफ अपार्टमेंट, डीड ऑफ अपार्टमेंट, अदलाबदल दस्त/डीड ऑफ एक्सचेंज, बक्षीस पत्र, टी.डी.आर. खरेदीखत, गहाण खत, बंध पत्र वगैरे लिहून नोंदवू देणे, त्यासाठी वेळोवेळी रक्कम रोख स्वरुपात किंवा धनादेशाद्वारे, डी.डी., RTGS, NEFT इत्यादी स्वरुपात स्वीकारणे, त्यानुसार त्याच्या विक्रीपोटी येण्याऱ्या रक्कमेचा संपुर्ण होणाऱ्या/झालेल्या नफा-तोट्याचा संपूर्णपणे

जलन - ३
दस्त क्र. ६१०७ /२०१७
४।४२८

उपभोग घेण्याचा अशे सर्व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना कायम स्वरूपी बहाल केलेले आहेत.

६. विकासक/डेव्हलपर्स बांधणार असलेल्या एकूण ८ (आठ) फ्लॅट पैकी मालकांना पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. १०१ व १०२, दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०१ व २०२ आणि तळ मजल्यावरील दुकान नं. २ (दोन) मोबदल्यापोटी मिळावयाचे बांधकाम वगळता उर्वरीत तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०१ व ३०२, चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४०१ व ४०२ आणि तळ मजल्यावरील दुकान नं. १ चे बांधकाम संबंधीतले विक्रीसाठी, लीजने देणे कामी, लिव्ह & लायसन्स तत्वावर भाड्याने देणे कामी किंवा लिहून घेणार यांना योग्य वाटेल त्या कोणत्याही कामासाठी, पैश्याचे व्यवहार करणे, वित्तीय संस्था व बँक यांच्याकडून येणारे चेक/धनादेश लिहून घेणार यांच्या नावाने घेण्यासाठीचे सर्व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना कायम स्वरूपी बहाल केलेले आहेत.

७. त्याचप्रमाणे, खाली नमूद परिशिष्टा मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधीत असलेले सर्व प्रकारचे दस्त लिहून देणार तर्फे लिहून घेणार यांनी दुय्यम निबंधक, जळगाव /सब-रजिस्ट्रार ऑफिस यांच्याकडे उपस्थित करून लिहून नोंदवून देणे बाबतचे सर्व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिले आहेत.

८. तसेच सदर मिळकतीवर लिहून घेणार त्यांच्या नियोजित बांधकामाचा व प्रकल्पाचा आवश्यक तो बोर्ड लावण्याचे तसेच लिहून घेणार यांना योग्य वाटेल त्या स्वरुपात कोणत्याही प्रकारे जाहिरात करण्याबद्दलचे सर्व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना बहाल केले आहेत.

९. तसेच मिळकतीविषयक महानगरपालिका कर, जमीन महसूल, पाणीपट्टी, वीज यांची देणी, त्या त्या खाती भरण्याचे कायमचे सर्व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दलेले आहेत.

१०. मिळकतीच्या क्षेत्रावर जे बांधकाम केले जाईल, त्या बांधकामात एकूण ८ (आठ) फ्लॅट व २ (दोन) दुकानापैकी मालकांना पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. १०१ व १०२, दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०१ व २०२ आणि तळ मजल्यावरील दुकान नं. २ (दोन) मोबदल्यापोटी मिळावयाचे बांधकाम वगळता उर्वरीत तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०१ व ३०२, चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४०१ व ४०२ आणि तळ मजल्यावरील दुकान नं. १ इतर सर्व बांधकामात फ्लॅट खरेदीदार, भाडेकरू किंवा लायसेन्सी ठेवण्याचा अधिकार लिहून घेणार यांना दिला आहे. व त्यासाठी आवश्यक असलेले सर्व करार, डीड, इ. व इतर सर्व कागदपत्रे, लिहून नोंदवून देण्याचे सर्व अधिकार लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना कायमचे बहाल केलेले आहेत.

११. त्याचप्रमाणे सदर मिळकत डेव्हलपमेंट करणे कामी लिहून देणार यांच्या वतीने लिहून घेणार यांना जी जी कामे करावी लागली असती ती ती सर्व कामे लिहून घेणार यांनी करावयाची आहे.

१२. प्रस्तुत कधीही न रद्द होणारे जनरल मुखत्यार पत्र हे लिहून देणार यांच्या सह त्यांच्या वंश-वालीवारसांवर बंधनकारक आहे व भविश्यातही राहील.

१३. विकासक/ डेव्हलपर्स ही भागीदारीपत्रक दिनांक १६/११/२०१० च्या अटी व शर्तीनुसार भागीदारी संस्था असून. आज रोजी अधिकृत भागीदार म्हणून १) श्री. सुमित प्रकाशचंद मुथा २) सौ. विनिता सुमित मुथा ३) श्री. अजय शांतीलाल ललवाणी आहेत तरी प्रस्तुत करार निष्पादित करणेबाबत व सह दुय्यम

जलन - ३
दस्त.क्र. २७०७ /२०१७
४५/२८
THE SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR CLASS-2 JALGAON-3

निबंधक यांच्या कडे नोंदणी करणेबाबत सर्व भागीदारांनी दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या सामंजस्य ठरावानुसार भागीदारी संस्थे तर्फे सदर मिळकती संबंधित व्यवहाराबद्दल सर्व प्रकारच्या दस्तांवर, सर्व भागीदारांच्या वतीने सह्या करण्याचे हक्क **श्री. सुमित प्रकाशचंद मुथा** यांना दिलेले आहेत व त्या अनुशंगाने **श्री. सुमित प्रकाशचंद मुथा** हे सर्व भागीदारांच्या वतीने प्रस्तुत दस्तावर सही करत आहेत.

**परिशीष्ट - १**

**(सदरील मिळकतीचे वर्णन)**

तुकडी जिल्हा जळगाव, पोट तुकडी तालुका जळगाव, सब-रजिस्ट्रेशन ऑफिस, जळगाव पैकी मौजे मेहरूण शिवारातील जळगाव शहर महानगरपालिका जळगाव यांचे हद्दीतील, (विभाग क्र. ७/२१७अ) मेहरूण शेत सर्व्हे नंबर ४७७ यात मंजूर केलेल्या नकाशा प्रमाणे प्लॉट पाडलेले असून त्यापैकी प्लॉट नं. १६ याचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ७१९.५३ चौ.मी. (७७४५ चौ. फुट) असून विस्तारित क्षेत्र सिटी सर्व्हे, जळगाव नुसार नगर भूमापन क्र. ६६५३ दिलेला असून त्याचे एकूण क्षेत्र ७३३.३० चौ.मी. आहे. सदर प्लॉट जागेस या संपूर्ण प्लॉट जागेपैकी पश्चिमेकडील निम्मे प्लॉट जागा याचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे क्षेत्र ३५९.७६ चौ.मी. (३८७२.५ चौ. फुट) असून सिटी सर्व्हे रेकॉर्डप्रमाणे क्षेत्र ३६६.६५ चौ.मी. आहे. तसेच प्रस्तावित बांधकाम प्लॅन नुसार क्षेत्र ३५९.१६ चौ.मी. यांसी चतु:सिमा, लांबी-रुंदी येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | ह्याच सिटी सर्व्हे नंबरातील राहिलेली निम्मे हिश्याची मिळकत (लांबी-रूंदी ८४ फुट) |
| पश्चिमेस | - | प्लॉट नं. १ (लांबी-रूंदी ९८ फुट) |
| उत्तरेस | - | रोड रस्ता (लांबी-रूंदी तिरकस) |
| दक्षिणेस. | - | प्लॉट नं. १५ (लांबी-रूंदी ४२.५ फुट) |

**परिशीष्ट 'अ'**

वरील प्लॉट मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या फ्लॅट्स आणि दुकाने यांचे वर्णन खालीलप्रमाणे :

१) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील तळ मजल्यावरील दुकान नंबर १ (एक) याचे एकूणात बांधीव क्षेत्र २२.९५ चौरस मीटर. याचे चटई क्षेत्र १९.४३ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ११.७७६ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १६ चा उर्वरित भाग. |
| पश्चिमेस | - | दुकान नं. २. |
| उत्तरेस | - | स्टेअरकेस, मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे १८.३० मीटर रुंद रस्ता. |
| दक्षिणेस | - | सदर इमारतीमधील पार्किंग एरिया. |

२) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील तळ मजल्यावरील दुकान नंबर २ (दोन) याचे एकूणात बांधीव क्षेत्र २२.९७ चौरस मीटर. याचे चटई क्षेत्र १९.४३ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ११.७७६ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | दुकान नं. १ |
| पश्चिमेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १ |
| उत्तरेस | - | स्टेअरकेस, मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे १८.३० मीटर रुंद रस्ता. |
| दक्षिणेस | - | सदर इमारतीमधील पार्किंग एरिया. |

३) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील पहिला मजल्यावरील फ्लॅट नंबर १०१ (एकशे एक) याचे एकूणात बांधीव क्षेत्र ९७.८२ चौरस मीटर याचे चटई क्षेत्र ९०.८८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ५०.१६३ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | १.२० मीटर पॅसेज, लिफ्ट लॉबी. |
| पश्चिमेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १ |
| उत्तरेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे १८.30 मीटर रुंद रस्ता. |
| दक्षिणेस | - | फ्लॅट नं. १०२. |

४) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नंबर १०२ (एकशे दोन) याचे एकूणात बांधीव क्षेत्र. ६१.८० चौरस मीटर याचे चटई क्षेत्र ५७.३८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ३१.६९२ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १६ चा उर्वरित भाग |
| पश्चिमेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १ |
| उत्तरेस | - | १.२० मीटर रुंद पॅसेज, लिफ्ट लॉबी व फ्लॅट नंबर १०१ |
| दक्षिणेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १५. |

५) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर २०१ (दोनशे एक) याचे एकूणात बांधीव क्षेत्र ९७.८२ चौरस मीटर याचे चटई क्षेत्र ९०.८८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ५०.१६३ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | १.२० मीटर पॅसेज, स्टेअरकेस व लिफ्ट लॉबी. |

जलन - ३
दस्त क्र. २७०७/२०१७
४०/२८

पश्चिमेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १

उत्तरेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे १८.30 मीटर रुंद रस्ता.

दक्षिणेस - फ्लॅट नं. २०२.

६) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर २०२ (दोनशे दोन) याचे एकूणात बांधीव क्षेत्र. ६१.८० चौरस मीटर याचे चटई क्षेत्र ५७.३८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ३१.६९२ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

पुर्वेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १६ चा उर्वरित भाग

पश्चिमेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १

उत्तरेस - १.२० मीटर रुंद पॅसेज, लिफ्ट लॉबी व फ्लॅट नंबर २०१

दक्षिणेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १५.

७) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील तीसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ३०१ (तीनशे एक) याचे एकूणात बांधीव क्षेत्र ९७.८२ चौरस मीटर याचे चटई क्षेत्र ९०.८८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ५०.१६३ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

पुर्वेस - १.२० मीटर पॅसेज, स्टेअरकेस व लिफ्ट लॉबी.

पश्चिमेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १.

उत्तरेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे १८.३० मीटर रुंद रस्ता.

दक्षिणेस - फ्लॅट नं. ३०२.

८) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील तिसऱ्या म जल्यावरील फ्लॅट नंबर ३०२ (तिनशे दोन) याचे एकूणात बांधीव क्षेत्र. ६१.८० चौरस मीटर याचे चटई क्षेत्र ५७.३८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ३१.६९२ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

पुर्वेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १६ चा उर्वरित भाग

पश्चिमेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १

उत्तरेस - १.२० मीटर रुंद पॅसेज, लिफ्ट लॉबी व फ्लॅट नंबर ३०१

दक्षिणेस - मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १५.

९) वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ४०१ (चारशे एक) याचे एकूणात बांधीव क्षेत्र ९७.८२ चौरस मीटर याचे

जलन - ३
दस्त क्र. २७०७ /२०१७
४८/५८

चटई क्षेत्र ९०.८८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ७०.१६३ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | १.२० मीटर पॅसेज, स्टेअरकेस व लिफ्ट लॉबी. |
| पश्चिमेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १. |
| उत्तरेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे १८.३० मीटर रुंद रस्ता. |
| दक्षिणेस | - | फ्लॅट नं. ४०२. |

१०)वर परिशिष्ट-१ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट क्षेत्रा वरील बांधण्यात येणाऱ्या इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर ४०२ (चारशे दोन) याचे एकूणात बांधीव क्षेत्र. ६१.८० चौरस मीटर याचे चटई क्षेत्र ५७.३८ चौरस मीटर व तळ जमिनीतील अविभाज्य क्षेत्र ३१.६९२ चौरस मीटर यासी चतु:सिमा येणेप्रमाणे;

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १६ चा उर्वरित भाग |
| पश्चिमेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १ |
| उत्तरेस | - | १.२० मीटर रुंद पॅसेज, लिफ्ट लॉबी व फ्लॅट नंबर ४०१ |
| दक्षिणेस | - | मार्जीनल स्पेस व त्यापलीकडे प्लॉट नं. १७. |

येणेप्रमाणे कधीही न रद्द होणारे जनरल मुखत्यार पत्र दस्त लेख आम्ही लिहून देणार राजीखुशीने, स्वसंतोषाने, समजून उमजून, उभय साक्षीदारांसमक्ष स्वाक्षरी करुन आज रोजी लिहून दिला असे.

**आदित्य बिल्डर्स अँड डेव्हलपर्स**
**तर्फे प्राधिकृत भागीदार**
**श्री. सुमित प्रकाशचंद मुथा**



(लिहून घेणार)

**श्री. राजेंद्र रघुनाथ पाटील**



(लिहून देणार)

साक्षीदार:-

| जलन - ३ |
| --- |
| दस्त क्र. २९०७ /२०१७ |
| ४१५२६ |

१) सही:- विजय ठाकूर

नाव:- विजय हरीभाऊ ठाकूर

पत्ता:- संत मिराबाई नगर, जळगाव

2) सही:- [signature]

नाव:- ज्योतिका दिनकर पाटील

पत्ता:- गोद्री (प्र.नो) ता. जामनेर जि. जळगाव

## प्रतिज्ञापत्र

सदर दस्तावेज हा नोंदणी कायदा १९०८ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसारच नोंदणीस दाखल केलेला आहे. प्रस्तुत दस्तातील संपूर्ण मजकूर, निष्पादक व्यक्ती, साक्षीदार / ओळखदार व सोबत जोडलेल्या कागदपत्रांची सत्यता तपासली आहे. दस्ताची सत्यता / वैधता कायदेशीर बाबींसाठी दस्त निष्पादक, मुखत्यार व कबुलीधारक हे स्वतः जबाबदार राहतील. दस्तावेज सोबत जोडलेले कागदपत्रे कुलमुखत्यारधारक व्यक्ती असल्यास ती व्यक्ती इत्यादी बनावट, खोटे बेकायदेशीर आढळुन आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निष्पादकाची राहील तसेच दस्तात नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही कार्यालयात/न्यायालयात खटला/वाद/न्यायालयीन कारवाई दाखल नाही तसेच दस्तात नमूद मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयाकडून स्टे-ऑर्डर किंवा मनाई हुकुम मिळालेला नाही. याबाबतची समज दस्तातील लिहून देणार/ घेणार दोन्ही पक्षकारांना आहे व सदर मजकूर आम्ही वाचला असून तो आम्हाला मान्य व कबुल आहे.

SEAL OF THE JOINT SUB-REGISTRAR CLASS-II JALGAON-3

**आदित्य बिल्डर्स ॲंड डेव्हलपर्स**
**तर्फे प्राधिकृत भागीदार**
**श्री. सुमित प्रकाशचंद मुथा**

(लिहून घेणार)

**श्री. राजेंद्र रघुनाथ पाटील**

(लिहून देणार)